■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ११ ● मंगळवार, दि. ५ ते १२ ऑगष्ट २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## 'वाशिम शेती शिल्प'चे चिया बियाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट

**जिल्हाधिकारी बुवनेश्वरी यांचा उपक्रम शेतकऱ्यांसाठी नवा आत्मविश्वास**

वाशिम, दि. ३ ऑगस्ट (जिमाका) जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनाचे प्रतीक ठरलेल्या 'वाशिम शेती शिल्प' या स्थानिक कृषी ब्रँडखाली उत्पादित चिया बियाण्यांचे नमुने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट स्वरूपात सादर करण्यात आले. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी हा उपक्रम हाती घेत शेतकऱ्यांच्या उत्पादने राज्यस्तरावर पोहोचवण्याची दिशा दाखवली आहे.

जिल्हा कृषीप्रधान असून, इथल्या शेतकऱ्यांनी विविध पीक उत्पादनामध्ये आपली विशिष्ट ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्यातील दर्जेदार शेतमालाला एक विशिष्ट ओळख देण्यासाठी 'वाशिम शेती शिल्प' हा ब्रँड विकसित करण्यात आला आहे. या अंतर्गत उत्पादित होणारी चिया बियाणे ही एक पोषणमूल्यांनी समृद्ध आणि बाजारात मागणी असलेली नगदी पीक मानली जाते.



या भेटीद्वारे ना केवळ वाशिमच्या कृषी उत्पादनांना मान्यता मिळाली, तर शेतकऱ्यांच्या परिश्रमालाही शासनपातळीवर गौरव मिळाला. जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांपुढे हा उपक्रम मांडताना सांगितले की, शेतकऱ्यांचे उत्पादन हे दर्जेदार असून, योग्य मार्केटिंग आणि शासनाची साथ मिळाल्यास त्यांचा आर्थिक स्तर उंचावता येईल. 'वाशिम शेती शिल्प' या ब्रँडअंतर्गत पुढील काळात इतरही उत्पादनांना स्थानिक ओळख देत सस्टेनेबल मार्केट साखळी निर्माण केली जाणार आहे.

या उपक्रमामुळे जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांमध्येही नव्या प्रेरणेला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मुख्यमंत्र्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## जिल्ह्यात नवीन आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज मागविले

वाशिम, दि. ३ ऑगस्ट (जिमाका) शासन निर्णय दि. २७ मार्च २०२५ नुसार जिल्ह्यात आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, नगर परिषद, नगरपंचायत आणि ग्रामपंचायत हद्दीतील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तपशील : अर्ज स्वीकारण्याची मुदत : १९ ऑगस्ट २०२५

अर्ज व माहिती उपलब्ध : जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर www.washim.nic.in

अर्ज सादर करण्याचे ठिकाण : संबंधित तहसील कार्यालयातील सेतू शाखा

अर्ज फी : प्रत्येकी २००/-

अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे (छायांकित प्रतीसह): आधार कार्ड,पॅन कार्ड, रेशन कार्ड, १२ वीचे प्रमाणपत्र, पदवी / पदव्युत्तर प्रमाणपत्र, संगणक शिक्षण (MS-CIT/CCC/ समकक्ष),मराठी व इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र (३०/४० शब्द प्रतिमिनिट), CSC ID प्रमाणपत्र,जागा भाडे तत्वावर घेतल्यास करारनामा (१००/- च्या स्टॅम्पवर)

महत्वाच्या अटी व शर्ती : उमेदवार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक. एकच अर्ज ग्राह्य धरला जाईल; कुटुंबातील दुसऱ्या सदस्याचा अर्ज अमान्य केला जाईल. सर्व कागदपत्रे समक्ष सादर करणे बंधनकारक; पोस्ट/ईमेलद्वारे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. चुकीची माहिती दिल्यास अर्ज फेटाळण्यात येईल व कायदेशीर कारवाई होईल. केंद्राच्या ठिकाणात बदल आढळल्यास केंद्र रद्द केले जाईल. सेवा केंद्राच्या सर्व सुचनांचे व आदेशांचे पालन बंधनकारक राहील. जिल्हाधिकारी व जिल्हा सेतू समितीचा निर्णय अंतिम राहील. अधिक माहिती व अर्जासाठी संपर्क करा : सेतू शाखा, संबंधित तहसील कार्यालय निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा सेतू समिती, वाशिम यांनी कळविले आहे.

## क्रांतीसिंह नाना पाटील जयंतीनिमित्त अभिवादन



वाशिम, दि. ३ ऑगस्ट (जिमाका) स्वातंत्र्य संग्रामातील धगधगते अग्रदूत, प्रजासत्ताक सरकाराचे स्थापक आणि शेतकऱ्यांचे कैवारी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात अधीक्षक सुनील घोडे यांच्या हस्ते क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कार्याचा आणि विचारांचा स्मरण करीत त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, शेतकरी-श्रमिकांसाठीचा त्यांचा संघर्ष यावर मनोगते व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या जीवनावर आधारित भाषणे व घोषवाक्यांद्वारे श्रद्धांजली अर्पण केली.

## सहकार पुरस्कारासाठी १८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

वाशिम, दि. ३ ऑगस्ट (जिमाका) : राज्याच्या सहकार चळवळीच्या विकासात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य सरकारमार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. सन २३-२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याकरीता अर्ज करण्यासाठी १८ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पुरस्कारांमध्ये सहकार महर्षी १ पुरस्कार, सहकार भुषण २१ पुरस्कार, सहकार निष्ठ २३ पुरस्कार अशा ४५ संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे. या पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करण्याकरीता सहकारी संस्थांना ३१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, आता जिल्ह्यातील नोंदणीकृत सर्व पात्र सहकारी संस्थांनी सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असुन अशा संस्थांनी दि. १८ ऑगस्ट पर्यंत त्यांचे प्रस्ताव संबंधित संस्थेचे मुख्यालय ज्या तालुक्यात आहे, त्या तालुक्याचे सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे.

### ■ उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर : वाशिम तहसील कार्यालयात विविध योजनांचे आदेश व दाखल्यांचे लाभार्थ्यांना वितरण

# महसूल प्रशासन हे जनतेच्या दारात न्याय आणणारे व्यवस्थापन

**वाशिम, दि. ३ ऑगस्ट (जिमाका) महसूल विभाग हा शासनाच्या कार्यपद्धतीतील महत्त्वाचा कणा आहे. सामान्य जनतेच्या संपर्कात सर्वाधिक वेळ येणाऱ्या या विभागाची जबाबदारी मोठी असून त्यातून जनतेचा शासनावरचा विश्वास दृढ होतो. महसूल सप्ताह निमित्ताने आपण विविध योजनांचे आदेश, दाखले, सनद आणि मंजुरी पत्रकांचे वाटप करत आहोत. हे वाटप ही केवळ कागदांची देवाणघेवाण नसून, ही लोककल्याणाच्या दृष्टीने एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. शासनाच्या योजना खऱ्या अर्थाने सामान्यांपर्यंत पोहोचत आहेत, हेच याचे प्रतिबिंब आहे.असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी केले.**

१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट हा महसूल सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. या सप्ताहाअंतर्गत २ ऑगस्ट २०२५ रोजी तहसील कार्यालय, वाशिम येथील नवीन सभागृहामध्ये पात्र लाभार्थ्यांना योजना निहाय आदेश व कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. आरडीसी घुगे म्हणाले आज महसूल दिनाच्या निमित्ताने आपण विविध योजनांचे आदेश, दाखले, सनद आणि मंजुरी पत्रकांचे वाटप करत आहोत. हे वाटप ही केवळ कागदांची देवाणघेवाण नसून, ही लोककल्याणाच्या दृष्टीने एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. शासनाच्या योजना खऱ्या अर्थाने सामान्यांपर्यंत पोहोचत आहेत, हेच याचे प्रतिबिंब आहे. आपल्या सर्व महसूल कर्मचाऱ्यांनी नेहमीच पारदर्शक, तत्पर व उत्तरदायी सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर



लवकरात लवकर योग्य निर्णय देणे हे आपले कर्तव्य आहे. महसूल सप्ताह हे केवळ एक औपचारिकता न राहता, कामात नवी ऊर्जा देणारा टप्पा असावा. प्रत्येक कर्मचाऱ्याने हे संकल्पपूर्वक आत्मसात करावे आणि लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण करावा. यावेळी तहसीलदार निलेश पळसकर आदी उपस्थित होते.

वाशिम तालुक्यातील ६ नागरिकांना २०११ पूर्वीचे अतिक्रमण, जे निकषात बसले आहेत, ते नियमअनुकूल करून सनदांचे वाटप करण्यात आले. ४७ प्रकरणांमध्ये पोटखराब (वर्ग-अ) क्षेत्र लागवडीयोग्य क्षेत्रामध्ये रूपांतरित करून (क.जा.प.) सातबारा वितरित करण्यात आले. ५ नागरिकांना अ.पा.क. पिक कर्ज मंजुरी प्रकरणांचे आदेश वितरित करण्यात आले. भूसंपादन कलम २८ अन्वये वाढीव मोबदला प्रकरणांमध्ये ७ लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याचे आदेश वितरित करण्यात आले. शासन निर्णय दि. ०२/०३/२०१९, ०८/०३/२०१९, १६/०३/२०२४ व १५/०५/२०२५ अन्वये भोगवटदार वर्ग-०२ मधून वर्ग-०१ मध्ये रूपांतरित करण्याचे आदेश.

सिलींग कायद्याअंतर्गत भोगवटदार वर्ग-२ शेतजमीन विक्रीसाठी परवानगी आदेश.

महाराष्ट्र तुकडे बंदी अधिनियम, १९४७ अंतर्गत भोगवटदार वर्ग-०१ शेतजमीन विक्री परवानगी आदेश. शासन निर्णय दि. ०२/०३/२०१९ नुसार धारणाधिकार 'ब' जागा विक्रीस परवानगी आदेश. शासन निर्णय दि. १६/०६/२०१६ व दि. २६/०६/२०१८ नुसार धारणाधिकार 'ब' जागेचे गहाणखत करून कर्ज काढणीस परवानगी आदेश. याशिवाय संगायो / श्रावणबाळ लाभार्थी मंजुरी आदेश, नवीन मतदार कार्ड, रेशनकार्ड, जातीचे दाखले, रहिवासी दाखले आदी प्रकारच्या दाखल्यांचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. संचालन कैलास देवळे व माधवराव शिंदे यांनी केले, तर आभार पि. यु. मापारी यांनी मानले.

## संपादकीय

# निर्जिवांचीही भाषा असते!

भाषा... ही कशी बरं तयार झाली, होते? ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ यांच्या संगमाने भाषा तयार होते. ही भाषा मौखिक, लिखित, संकेतात्मक याद्वारे व्यक्त केली जाते. मानव सोडून इतर सर्व घटक त्यांचे संवाद साधण्यासाठी हावभावांचा, शारीरिक हालचालींचा, विशिष्ट ध्वनींचा, रंग बदलण्याचा, शारीरिक गंधांचा उपयोग करतात. एक वैयक्तिक अनुभव आहे की, जेव्हा तुम्ही निसर्गातील कुठल्याही घटकांशी म्हणजे झाड, पान, फुलं, खोडं, दगड, सूक्ष्मजीव कशाशीही बोलला तरीही मनातल्या संवेदना, हृदयाची भाषा त्यांना समजते. थोडक्यात काय तर सजीव आणि निर्जीव घटक दोघेही भाषा समजतात. निसर्गाने प्रत्येकाला स्वतःचा असा एक ध्वनी दिला आहे, अगदी निर्जीव वस्तूला सुद्धा. आपल्याला निर्जीव वाटणारी वस्तू का बरं सजीव असते? कारण आपली ऊर्जा. सजीव सृष्टीतील काही घटक हे त्यांच्या भावना शब्दातून तर काही हावभावातून व्यक्त करतात जे प्रत्येक जण समजू शकतात. नैसर्गिक शब्द हे प्रत्येक प्रजातीप्रमाणे वेगळे असतात.

मानव काही पशू-पक्षीच पाळतो. सगळे पाळत नाही आणि त्यांच्याबरोबर आपला सुसंवाद नेहमी होत असतो. जसजसे आपण एकमेकांच्या सान्निध्यात राहतो तसतसे आपले बोलणे त्यांना समजते आणि जेव्हा आपण त्यांच्यासोबत राहतो तेव्हा आपल्याला सुद्धा त्यांची भाषा समजायला लागते. मग ही भाषा शब्दांमध्ये होते का? शब्द आपण वापरतो आणि ते त्यांचा ध्वनी. तरीही आपण एकमेकांशी किती छान सुसंवाद करतो. मी लहानपणापासून पक्ष्यांशी, प्राण्यांशी, झाडांशी, कीटकांशी सर्वांशीच बोलत आले आहे. त्यांचे अध्ययन करताना खूप म्हणजे खूप गोष्टी लक्षात आल्या. अगदी झाडांच्या पानांनी प्रेमाने केलेला स्पर्श बराचसा संवाद साधून जातो. जर त्यांना काही वचन दिले तर खरंच ते वाट बघताना सुद्धा मी पाहिले आहेत. निःस्वार्थी, प्रेमळ, कोणाशीही उगाच शत्रुत्व नसणारे, निसर्ग नियमानुसार चालणारे असे हे सजीव सृष्टीतील परमेश्वर निर्मित गुणवंत घटक. जेव्हा पक्ष्यांची भाषा शिकण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांची भाषा शिकताना खूप गोष्टी समजल्या. एवढेच काय तर गिनीपीग उंदराशी सुद्धा संवाद साधल्यावर उत्तर मिळाले आहे. गंमत म्हणजे, आपली भाषा ते लगेच समजतात. कशी? याचा जेव्हा विचार केला, अनुभव घेतला, अध्ययन केले तेव्हा एक गोष्ट लक्षात आली की, आपल्या चेहऱ्याचे हावभाव, आपल्या ओठांची हालचाल आणि आपल्या आवाजाची लय यातून आपण या जगातील कुठल्याही सजीव घटकांशी सुसंवाद साधू शकतो. तसं तर फुलांपासून ते प्राण्यांपर्यंत सर्वच घटकांशी बोलत आले आहे आणि या सर्वांना त्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रियेमधून त्यांच्या भावना प्रकट करताना चांगले-वाईट, सुख-दुःख, रडणं-हसणं अनुभव घेतले आहेत.

मी नाशिकला अधूनमधून जात असते आणि गेस्ट हाऊसला राहते. त्या गेस्ट हाऊसच्या जवळ एक जांभळाचे झाड आहे. कुणास ठाऊक पण मी गेल्यावर बाल्कनीत उभे राहून त्या झाडाशी कायम बोलते. सकाळी उठल्यावर गुड मॉर्निंग करून फांद्यांपुढे हात केल्यावर खरंच त्या फांद्या हाताला येऊन स्पर्श करीत. गंमत म्हणजे जेव्हा जेव्हा त्या गेस्ट हाऊसला उतरले तेव्हा तोच रूम मिळाला आणि प्रत्येक वेळेला त्या झाडाची फांदी हाताला स्वतःहून स्पर्श करीत असल्याचे जाणवले. जणू काय ते झाड मी येण्याची वाटचं पाहातंय. आमचा सुसंवाद हा कायमचं सुख आणि आनंद देऊन गेलाय. एकदा सीताफळाची झाडं दोन वेगळ्या कुंड्यांमध्ये आली होती. त्यातील एक झाड माझ्याकडून फांदी दुसरीकडे लावण्याच्या गडबडीत तुटली गेली.

## 'चांगले काम करणाऱ्यांना 'ते' नेहमी शाबासकी देतात'



**पुणे:** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केली. फडणवीस हे मेहनती राजकीय नेते असल्याचं पवारांनी म्हटले होते. यावर आता इंदापूरमध्ये मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत. चांगले काम करणाऱ्यांना ते नेहमी शाबासकी देतात, असे भुजबळ म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचे शरद पवारांनी कौतुक केले, ते योग्यच आहे, असेही ते म्हणाले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर छगन भुजबळ म्हणाले की, मला याबद्दल जास्त बोलायचे नाही. विरोधी पक्ष अशा गोष्टींचा फायदा घेणार, हे उघड आहे. मुख्यमंत्र्यांनी याबद्दल दोन वेळा नाराजी व्यक्त केली आहे, त्यामुळे यावर अधिक बोलणे टाळणेच योग्य आहे, असे ते म्हणाले. स्वस्त धान्य दुकानांची मागणी वाढली आहे. यावर भुजबळ यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली. लोकांची मागणी पूर्ण करण्यासाठी ते नक्कीच प्रयत्न करतील, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना मुंबईत बोलावून यावर चर्चा करण्याचे निश्चित केले आहे.

साप्ताहिक
पिंगलाक्षी एक्सप्रेस
नियमित वाचा




## ना.बावनकुळे यांच्याकडे मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

### माजी खा. अनंतराव देशमुख व ॲड. नकुल देशमुख यांनी घेतली महसुल मंत्र्याची भेट

रिसोडः रिसोड मालेगाव मतदारसंघासहित वाशिम जिल्ह्यात यावर्षी सातत्याने अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिकांचे संपूर्णपणे नुकसान झालेले असून बहुतांश ठिकाणी दुबार पेरणी करूनही शेतकऱ्याचे पीक खरडून गेले आहे. सततच्या अतिवृष्टीमुळे हवालदील झालेल्या शेतकरी बांधवांना नुकसानीचा भरीव मोबदला देण्याची मागणी माजी मंत्री अनंतराव देशमुख व भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांची मुंबई मंत्रालय येथे भेट घेऊन केली.

जुलैमध्ये पेरणी केल्यानंतर काहीच दिवसात रिसोड तालुका मालेगाव तालुका आणि वाशिम जिल्ह्यात अनेक ठिकाणी जमिनी खरडून गेल्या पैनगंगा नदीने रौद्ररूप धारण केल्याने होत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली होती आणि शेतकरी बांधवांना मोठ्या नुकसानी सामोरे जावे लागले होते तसेच मालेगाव तालुक्यात सातत्याने होत असलेल्या पावसामुळे शेतकरी अगदी त्रस्त झाला असून रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघ आणि वाशिम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दुबार पेरणी करावी लागली दुबार पेरणी करूनही पीक उगवल्यानंतर २१ व २२ जुलै रोजी पावसाने थैमान घातले होते अगदी ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती त्यामुळे पुन्हा शेतकऱ्यांचे पीक खरडून साफ झाले अधिकच त्रस्त झालेला शेतकरी बांधव अगदी हवालदीप झाला असल्याची व्यथा माजी खासदार अनंतराव देशमुख व भाजप नेते नकुल देशमुख यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे र यांच्याकडे मांडली मुंबई येथे मंत्रालयात महसूल मंत्री यांची भेट घेतली. (वी.प्र)

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याची मागणी

रिसोड मालेगाव विधानसभा आणि वाशिम जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना मदतीची गरज आहे करिता शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई देण्याची मागणी माजी मंत्री देशमुख व नकुल देशमुख यांनी महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे केली आहे.



■ पाच वर्षांनी छाननी केली जाणार
■ १७ ते १८ टक्के कार्ड रद्द होऊ शकतात

## ..तर रेशन कार्ड रद्द होणार

**मुंबई:** केंद्र सरकारने २२ जुलै रोजी लक्षित सार्वजनिक वितरण प्रणाली सुधारणा आदेश, २०२५ अधिसूचित केला आहे. याअंतर्गत ६ महिने रेशन न घेणाऱ्यांचे कार्ड ॲक्टिव्ह राहणार नाही. त्यानंतर तीन महिन्यांत पुन्हा घरोघरी जाऊन तपासणी आणि ई-केवायसीद्वारे पात्रता निश्चित केली जाणार आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत रेशन न घेणारेही या कक्षेत येणार आहेत. देशात २३ कोटी ॲक्टिव्ह रेशन कार्ड आहेत. या प्रक्रियेत किती कार्ड रद्द झाले हे छाननीनंतर स्पष्ट होईल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यांमध्ये १७ ते १८ टक्के कार्ड रद्द होऊ शकतात. २५ लाखांहून अधिक कार्डांची नक्कल झाल्याचा अंदाज आहे. केंद्राने राज्यांना या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, अपात्र लोकांना बाहेर काढण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. ग्राहक आणि अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रेशन कार्डची पात्रता यादी दर ५ वर्षांनी तपासली जाईल. कार्डमध्ये नोंदणी कृत ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचा आधार क्रमांक आवश्यक असेल.

### पोर्टलवर राज्ये प्रतीक्षा यादी जाहीर होणार!

**राज्यात ८ कोटी ७१ लाख शिधापत्रिका**

पाच वर्षे पूर्ण झाल्यावर केवायसी बंधनकारक असेल. दुहेरी प्रवेश कार्ड ३ महिन्यांसाठी निलंबित केले जाईल आणि केवायसी केले जाईल. नवे रेशनकार्ड 'प्रथम या, प्रथम पाओ' तत्त्वावर तयार करण्यात येणार आहे. पोर्टलवर राज्ये प्रतीक्षा यादी जाहीर करतील. बिहारमध्ये मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेवरून राजकीय उलथापालथ सुरू असतानाच रेशन कार्डसंदर्भातील आदेशामुळे नवा वाद निर्माण होऊ शकतो. राज्यात ८ कोटी ७१ लाख शिधापत्रिका आहेत. बिहारमधील अनेक खासदारांनी वेळेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मतदार यादीप्रमाणेच विरोधकही या निर्णयाचा प्रचार जनतेचे रेशनकार्ड रद्द म्हणून करू शकतात, असे त्यांचे मत आहे.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# तुडुंब भरलेल्या आसरामाता तलाव वेधतो प्रवाशांचे लक्ष

## एस.जी. जाधव कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून तलावाच्या सौंदर्यात भर



रिसोड : रिसोड ते लोणार राज्यमार्गावर असलेल्या आसरा माता तलाव सततच्या पावसाने तुडुंब भरला आहे.या तलावाच्या नैसर्गिक सौंदर्य साहजिक या मार्गावरून रहदारी करणाऱ्या प्रवाशांना अलगद थांबा घेणे भाग पाडते. विशेष म्हणजे एस. जी.कंट्रक्शनचे मालक सुधीर जाधव यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कोट्यवधींच्या विकास कामामुळे येथील मंदिर परिसराच्या सौंदर्यात मोठ्या प्रमाणात भर पडलेली आहे.

नवसाला पावणारे देवस्थान म्हणून सर्वदूर भर जहागीर येथील आसरामाता मंदिराची ओळख आहे. त्याच प्रमाणे जगदंबा मातेचे मंदिर तलावाच्या मध्य भागामध्ये असून या मंदिरामध्ये जाण्यासाठी तसेच नव्याने मंदिराची निर्मिती निस्सिम भक्त तथा एस.जी.कंट्रक्शनचे मालक सुधीर गणेशराव जाधव यांच्या माध्यमातून मागील अनेक वर्षापासून येथील मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळालेली आहे. या मंदिर परिसरामध्ये 'गुरुपौर्णिमेनिमित्त एक दिवसीय यात्रा भरते. तर, प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला महाप्रसादाचे मोफत वितरण होते. माजी राज्यमंत्री अनंतराव देशमुख यांनी केली विद्युत रोहित्राची व्यवस्था माजी राज्यमंत्री अनंतराव देशमुख हे आसरामाता संस्थानचे निस्सीम भक्त आहेत. येथील विकासाकडे त्यांचे आवर्जून लक्ष असते.काही ग्रामस्थासह व्यवसायिकांनी मंदिर परिसरातील विद्युत रोषणाई संदर्भात चर्चा करताच देशमुख यांनी स्वःखर्चाने गावठाण फिडरच्या रोहित्राची व्यवस्था केल्याने आनंदाचे वातावरण आहे.

### जाधव यांच्या पुढाकारातून मंदिराचा विकास

एस.जी.कंट्रक्शनचे मालक सुधीर गणेशराव जाधव यांनी जीर्ण झालेल्या पुरातण जगदंबा माता मंदिराच्या जागेवर नवीन मंदिराचे बांधकाम, सुसज्ज ब्रिज, सभागृह, टिनशेड, तलावामध्ये उतरण्यासाठी पायऱ्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत विकासाला चालना दिली.

### सानप यांच्याकडुन कामे प्रस्तावित

सेवानिवृत्त न्यायाधीश गोविंदराव सानप हे आसरा मातेचे निस्सीम भक्त आहेत. वाशीम जिल्हा पालक न्यायमूर्ती पदावर असतानी त्यांनी सुद्धा येथील मंदिर परिसरातील सौंदर्यात भर पाडण्यासाठी वृक्षारोपणासह विविध विकास कामांचे प्रस्ताव प्रस्तावित केलेले आहेत.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



रिसोड: देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्वाचे नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती यानिमित्त भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दोन्ही महापुरुषांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन जीवन जगण्याचा सल्ला मान्यवरांनी दिला. आदरणीय मंजुषा देशमुख, सुनील डहाळके, मंगला शेटे, प्रा. गुलाब साबळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने झाली. यात प्राचार्या मंजुषा देशमुख, पर्यवेक्षक सुनील डहाळके, ज्येष्ठ शिक्षिका मंगला शेटे आणि प्रमुख अतिथी प्रा. गुलाब साबळे यांचा समावेश होता. यानंतर उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान, विद्यार्थिनींनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, पोवाडे आणि गीते सादर केली. त्यात आरती साळवे, जान्हवी कांबळे, अनन्या वाठोरे, गायत्री गर्जे, पूजा जाधव, समृद्धी मोरे, सिद्धी खोडके, कोमल पोपळघट, कीर्ती कराड, योगिता पुरी, वर्षा गुंजाळ, प्रतीक्षा फुंदसे, श्रावणी खाडे, वैष्णवी मोरे, श्रुती खामकर, आकांक्षा घुगे, साक्षी लाटे, अक्षरा लोखंडे, राधिका हाडे, समृद्धी खडसे, भारती गव्हाणे, मान्यता भोसले, गायत्री वामन, साक्षी मुंडे, श्रावणी खराटे, दुर्गा डोरले, कविता टाकरस, स्नेहा मुंजे, भाविका भोपाळे, मोनू गवळी, वैष्णवी शेळके, तनिष्का खिल्लारे, श्रुती घोडे, दिपाली गरकळ, ईश्वरी खोडे, सेफीन शेख, प्रगती सुरकुटे, सेजल टिकाइत, वैभवी मोरे, श्रद्धा जहिरव, ईश्वरी उपाढ, अपूर्वा मोरे, प्राजक्ता भोसले, चेतना देशमुख, संस्कृती पावडे, स्नेहा मुंजे, मान्यता भोसले आणि समृद्धी मोरे या विद्यार्थिनींनी आपले विचार मांडले. 'अण्णाभाऊ साठे म्हणजे मराठी साहित्याला मोठी देण' शिक्षक सचिन पायघन, मंगला शेटे, सुनील डहाळके आणि प्रा. गुलाब साबळे यांनीही आपल्या मनोगतातून महापुरुषांचे विचार अजरामर असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या मंजुषा देशमुख यांनी लोकमान्य टिळक यांच्या दूरदृष्टीचे कौतुक केले, तसेच अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्याला दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव केला. 'मराठी साहित्यातील कोहिनूर' म्हणून त्यांनी अण्णाभाऊंचे वर्णन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका साधना बोरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंगला शेटे यांनी केले.

# ना. नितीन गडकरी यांचे घर बॉम्बने उडवून देण्याची धमकी

## काही तासांतच आरोपी जेरबंद

नागपूर : केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे उपराजधानीतील निवासस्थान बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा फोन रविवारी सकाळी आला. आलेल्या निनावी फोनमुळे शहरात खळबळ उडाली. ही घटना खोटी असल्याचे आढळून आले. पोलिसांनी फोन करणाऱ्या आरोपीचा शोध घेऊन त्याला काही तासांतच अटक करण्यात आली. उमेश राऊत (२५), असे आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून तपास सुरू आहे.

रविवारी सकाळी नागपूर पोलिस नियंत्रण कक्षाच्या डायल ११२ वर एका अज्ञात इसमाचा फोन आला. त्याने



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या घरी बॉम्ब ठेवल्याचा दावा केला आणि त्याचा लवकरच स्फोट होणार आहे, अशी माहिती मिळताच पोलिस आणि प्रशासनात खळबळ उडाली. बॉम्ब ठेवल्याची माहिती स्थानिक पोलिसांना आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या सुरक्षेत तैनात असलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. बॉम्बची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करीत केंद्रीय मंत्र्यांच्या राजवाड्यात आणि नरेंद्रनगर येथील निवासस्थानी बॉम्बपथक आणि श्वान पथकासह शोध मोहीम सुरू केली. सुमारे दोन तास चाललेली ही सखोल शोध मोहीम पूर्ण खबरदारीने राबवण्यात आली, परंतु या काळात कोणतीही स्फोटक सामग्री आढळली नाही. यानंतर, पोलिस आणि अधिकाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला, परंतु प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास सुरू ठेवण्यात आला.

पोलिसांनी तांत्रिक मदतीने कॉल नंबर ट्रेस करून आरोपीचा शोध सुरू केला. तपासादरम्यान, तुळशीबाग रोडवरील भूत बंगला कॉम्प्लेक्समधून पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले. तो नागपूरमधील एका दारूच्या दुकानात काम करतो. प्राथमिक चौकशीत त्याने धमकी दिल्याची कबुली दिली आहे. धमकी देण्याचा हेतू स्पष्ट होऊ शकला नाही. त्याने हे कृत्य विनोद म्हणून केले आहे, मानसिक असंतुलनामुळे आहे की इतर काही कारणाने आहे, हे पोलिस आता शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

### राज्यातील शाळांमध्ये अन्न विषबाधा टाळण्यासाठी नवीन मानक कार्यपद्धती जाहीर

मुंबई, दि. १ : राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेमधील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देण्यात येतो. या मध्यान्ह भोजनातून होणाऱ्या अन्न विषबाधेच्या घटनांना आळा घालण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सविस्तर मानक कार्यपद्धती जारी केली आहे. या योजनेत विद्यार्थ्यांना पौष्टिक, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आहार मिळावा यासाठी धान्य साठवण, स्वयंपाक, आहार वितरण आणि स्वच्छतेबाबत काटेकोर नियमावली निश्चित करण्यात आली आहे. धान्य व इतर घटकांची गुणवत्ता तपासणी, स्वयंपाकघराची स्वच्छता, आहाराची चव चाखणे, नोंदी ठेवणे, पाण्याची शुद्धता सुनिश्चित करणे, तसेच आहार नमुना २४ तास जतन करणे यांसारख्या उपाययोजना अनिवार्य करण्यात आल्या आहेत. मानक कार्यपद्धतीमध्ये शाळा व्यवस्थापन समित्या, मुख्याध्यापक, शिक्षक, स्वयंपाकी, मदतनीस, शिक्षणाधिकारी, आरोग्य विभाग व अन्न व औषध प्रशासन यांच्या जबाबदाऱ्यांचे स्पष्ट वर्णन करण्यात आले आहे. अन्न विषबाधेची घटना घडल्यास त्वरित वैद्यकीय मदत, नमुना तपासणी आणि दोषींवर कारवाईचे निर्देशही देण्यात आले आहेत.

ही कार्यपद्धती तत्काळ अंमलात आणण्याचे आदेश देण्यात आले असून, उल्लंघन झाल्यास संबंधितांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे.

### ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेमध्ये अर्ज करण्यासाठी १५ दिवसाची मुदतवाढ

मुंबई, दि. ३१ : राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेमध्ये अर्ज करण्यासाठी १५ दिवसाची मुदतवाढ देण्यात आल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी घोषित केले आहे.

राज्यामधील राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान या योजनेंतर्गत अर्ज भरण्यासाठीची शेवटची तारीख ३१ जुले २०२५ होती. राज्यातील अनेक कलाकार व कलाकार संघटनांनी ही मुदत वाढवावी, अशी मागणी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांच्याकडे केली होती. त्यांच्या विनंतीनुसार या योजनेंतर्गत अर्ज भरण्यासाठी १५ दिवसाची मुदतवाढ देण्यात येत आहे, अशी घोषणा मंत्री ॲड.शेलार यांनी केली आहे. या संदर्भात सांस्कृतिक कार्य संचालनालयाने योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देशही दिले आहेत.